| CNR NO.MHLA070000502018 | दाखल तारीख | : | २९.०१.२०१८ |
|---|---|---|---|
| | नोंदणी तारीख | : | २९.०१.२०१८ |
| | निकाल तारीख | : | २६.०५.२०२६ |
| | कालावधी | : | वर्ष महिने दिवस |
| | | | ०८ ०३ २७ |

**भाग – अ**

<u>**विशेष न्यायाधीश तथा अतिरीक्त सत्र न्यायाधीश, उदगीर यांचे न्यायालयात**</u>

**(पिठासीन अधिकारी श्री.डि.बी.म्हालटकर)**

<u>**न्यायनिर्णय**</u>

**निकाल दिनांक २६/०४/२०२६**

**विशेष खटला (ॲट्रॉसिटी) क्र.२/२०१८**

**निशाणी क्र.१३३**

| | | |
|---|---|---|
| **प्रथम खबर बाबत सविस्तर माहिती, गुन्हा आणि पोलीस ठाणे,** | | भारतीय दंड संहितेचे कलम १४३, २९४, २९५, ५०४, ५०६ सह १४९ व अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ चे कलम ३(१)(आर)(एस)(टी).<br>गु.र.क्र. १७७/२०१७<br>पोलीस ठाणेः जळकोट |
| **तक्रारदार/अभियोगपक्ष** | | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत उपविभागीय पोलीस अधिकारी अहमदपुर, ता.उदगीर, जि.लातूर |
| **अभियोगपक्षा करीता** | | श्री.एस.आय.बिराजदार |

| | | |
|---|---|---|
| **आरोपी** | | १. तुराब दावल पटेल<br>वयः– ६५ वर्षे, व्यवसायः– शेती,<br>२. नवाज नन्हु शेख<br>वयः– ४५ वर्षे, व्यवसायः– शेती,<br>३. दाउद रशीद बिरादार<br>वयः– ३६ वर्षे, व्यवसायः– शेती,<br>४. शादुला ऐनोद्यीन गोलंदाज<br>वयः– ४७ वर्षे, व्यवसायः– शेती,<br>५. इस्माईल मौलाखा पठाण<br>वयः– ६० वर्षे, व्यवसायः– शेती,<br>६. अलहमदु उर्फ हनीफ इस्माईल पठाण<br>वयः– २८ वर्षे, व्यवसायः– शेती,<br>७. यजाज शादुल गोलंदाज<br>वयः– ४० वर्षे, व्यवसायः– शेती,<br>८. इमाम खुशाल चंदा<br>वयः– ४० वर्षे, व्यवसायः– शेती,<br>९.हयुल राशीद बिरादार<br>वयः– ४० वर्षे, व्यवसायः– शेती,<br>१०. जरीनाबी मैनोद्यीन जमादार<br>वयः– ३८ वर्षे, व्यवसायः– घरकाम,<br>सर्व रा.मरसांगवी,ता.जळकोट, जिल्हा लातूर |
| **आरोपीतर्फे विधीज्ञ** | | श्री. एन.एन.पटेल |

**भागः–ब**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | ३०/०९/२०१७ |

| | | |
|---|---|---|
| प्रथम खबर दिनांक | : | ०२/१०/२०१७ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | : | २९/०१/२०१८ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | : | ०९/०७/२०२१ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | : | ०५/०६/२०२४ |
| न्यायनिर्णय आरक्षित केल्याचा दिनांक | : | २६/०५/२०२६ |
| निकाल दिल्याचा दिनांक | : | २६/०५/२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास त्याचा दिनांक | : | -- |

## आरोपीची सविस्तर माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन दिल्याचा दिनांक | दोषारोप निश्चित केल्याचे कलम | शिक्षा किंवा दोषमुक्त | शिक्षा | संपरीक्षेदरम्यान आरोपी कोठडीत असल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | तुराब दावल पटेल | ०२.१२.२०१७ | ०२.१२.२०१७ | भारतीय दंड संहितेचे कलम १४३, २९४, २९५, ५०४, ५०६ सह १४९ व अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ चे कलम ३(१)(आर)(एस)(टी) | दोषमुक्त | -- | ०० वर्ष ०० दिवस |
| २ | नवाज नन्हु शेख | ०२.१२.२०१७ | ०२.१२.२०१७ | -"- | दोषमुक्त | -- | ०० वर्ष ०० दिवस |
| ३ | दाउद राशीद बिरादार | ०२.१२.२०१७ | ०२.१२.२०१७ | | दोषमुक्त | -- | ०० वर्ष ०० दिवस |
| ४ | शादुला ऐनोद्यीन गोलंदाज | ०२.१२.२०१७ | ०२.१२.२०१७ | -"- | दोषमुक्त | -- | ०० वर्ष ०० दिवस |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | इस्माईल मौलाखा पठाण | ०२.१२.२० १७ | ०२.१२.२० १७ | –"– | दोषमुक्त | –– | ०० वर्ष ०० दिवस |
| ६ | अलहमदु उर्फ हनीफ इस्माईल पठाण | ०२.१२.२० १७ | ०२.१२.२० १७ | –"– | दोषमुक्त | –– | ०० वर्ष ०० दिवस |
| ७ | यजाज शादुल गोलंदाज | ०२.१२.२० १७ | ०२.१२.२० १७ | –"– | दोषमुक्त | –– | ०० वर्ष ०० दिवस |
| ८ | इमाम खुशाल चंदा | ०२.१२.२० १७ | ०२.१२.२० १७ | –"– | दोषमुक्त | –– | ०० वर्ष ०० दिवस |
| ९ | हयुल राशीद बिरादार | २८.१२.२० १७ | २८.१२.२० १७ | –"– | दोषमुक्त | –– | ०० वर्ष ०० दिवस |
| १० | जरीनाबी मैनोद्दीन जमादार | १७.०१.२० १८ | १६.०१.२० १८ | –"– | दोषमुक्त | –– | ०० वर्ष ०० दिवस |

## न्यायनिर्णय

**(खुल्या न्यायालयात घोषीत)**

**(निकाल दिनांक २६ मे २०२६)**

प्रस्तुतचा खटला हा आरोपींविरूध्द त्यानी भारतीय दंड संहितेचे कलम १४३, २९४, २९५, ५०४, ५०६ सह १४९ व अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ चे कलम ३(१)(आर)(एस)(टी) अन्वये दंडनिय अपराधाकरीता दाखल करण्यात आला आहे.

**अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः–**

०२. गाव मौजे मरसांगवी पोस्ट रावणकोळा ता.जळकोट, जिल्हा लातूर येथे डोंगरगाव ते मरसांगवी रस्त्यावर खुल्या जागेमध्ये बौध्द बांधवानी पंचशील ध्वज विजयादशमी निमित्त उभारला होता. त्याठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाकरीता जागा नियोजित केली होती. दिनांक ३०.०९.२०१७ रोजी

विजयादशमी दिवशी गावातील सर्व बौध्द बांधव, पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष, इतर गावकरी असे सकाळी १०.०० वाजता उपस्थित राहुन सकाळी १०.०५ मिनिटानी पंचशील ध्वजरोहण करण्यात आले. त्यानंतर सर्व बौध्द बांधव आपापल्या घरी गेले. त्यानंतर आरोपी तुराब पटेल व इतर यानी जरीनाबी हिस पुढे करुन जातीवाचक घोषणा दिल्या. त्यांनी 'महार के, धेंडके, मांगके इसकी क्या औकात है' अशा अश्लील शिव्या दिल्या. तसेच बौध्द समाजातील महिलांकडे बोट दाखवत अधनग्न होवुन नारेल तकदीर अशी घोषणा दिली. तसेच सर्व आरोपींनी बेकायदा जमाव करुन जातीय तेढ निर्माण करण्याकरीता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा फलक खाली पाडला, महिलांना अश्लील शिवीगाळ केली तसेच धक्काबुक्की करुन जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानी समाज बांधवाच्या भावना दुखावल्या. त्यामुळे वर्दिदार तानाजी शंकर वाघमारे याने जळकोट पोलीस ठाण्यात त्याबाबत फिर्याद दिली. त्या अनुषंगाने जळकोट पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहिता कलम १४३, २९४, २९५ व अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ चे कलम ३(१)(आर)(एस)(टी) व नागरी हक्क संरक्षण कायदा चे कलम ७(१)(ड) प्रमाणे गुन्हा क्र.१७७/२०१७ दिनांक ०२.१०.२०१७ रोजी नोंदवण्यात आला.

०३. सदर गुन्हयाचा तपास हा उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीधर रघुनाथराव पवार यांचेकडे आला. त्यानी घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले, जात प्रमाणपत्रे गोळा केली, आरोपींना अटक केली. तसेच खाली पाडलेला फलक जप्त केला. त्यानंतर त्यानी आरोपींना तांत्रिक अटक केली. त्यांच्या विरुध्द पुरावा मिळुन आल्याने दोषारोपपत्र दाखल केले.

०४. माझे पुर्वाधिकारी न्यायाधीश यांनी आरोपी विरूध्द भारतीय दंड संहितेचे कलम १४३, २९४, २९५, ५०४, ५०६ व अनुसुचित जाती व

अनुसुचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ चे कलम ३(१)(आर)(एस)(टी) अन्वये खालील शिक्षापात्र कलमांतर्गत नि.क्र.४२ नुसार दोषारोप ठेवले. आरोपींनी गुन्हा केल्याचे नाकारले व खटला चालविण्याची मागणी केली.

०५. याकामी अभियोग पक्षातर्फे ०७ साक्षीदार तपासण्यात आले व कागदोपत्री पुरावा सादर करण्यात आला. आरोपीं विरुध्द आलेला पुरावा प्रश्नोत्तर स्वरुपात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३ प्रमाणे (निशाणी १२३ ते १३२) आरोपींना विचारुन त्यांचा खुलासा नोंदवण्यात आला. आरोपींनी राजकीय वादातुन खोटी केस दाखल केली असल्याचे सांगितले. त्यांनी कोणताही तोंडी किंवा लेखी पुरावा दिलेला नाही.

०६. मी सरकारी अभियोक्ता व आरोपींचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. न्यायालयासमोर आलेल्या मौखीक व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले. प्रस्तुत न्यायनिर्णयामध्ये त्याचा उल्लेख आवश्यकतेनुसार केला आहे.

०७. दोषारोपपत्र निश्चित केलेले दोषारोप व आलेला पुरावा या अनुषंगाने माझ्या समोर खालील नमुद मुद्दे उपस्थित झाले असून त्याबाबतचे कारणांसहीत निष्कर्ष खालील प्रमाणे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **उत्तरे** |
|---|---|---|
| १. | दिनांक ३०.०९.२०१७ रोजी दुपारी १२.३० वाजता गाव मौजे मरसांगवी ता.जळकोट येथे मरसांगवी ते डोंगरगाव रस्त्यावर खुल्या जागेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या फलकाची विटंबना करण्याच्या व इतर गुन्हा करण्याच्या समान उद्येशपुर्तीकरीता आरोपींनी बेकायदा जमाव केला, हे अभियोग पक्ष शाबीत करतो काय ? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| २ | वर नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी बेकादेशिर जमावाच्या समान उद्येशपुर्ती करीता सार्वजनिक ठिकाणी वर्दिदार व साक्षीदारांना 'महार के, धेंडके, मांगके इसकी क्या औकात है' अशी अश्लील शिवीगाळ वर्दिदार व साक्षीदारांना त्रास देण्याकरीता केली हे अभियोग पक्ष शाबीत करतो काय ? | नाही. |
| ३. | वर नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी बेकायदेशिर जमावाच्या समान उद्येशपुर्ती करीता वर्दिदार व इतर बौध्द बांधवाच्या धर्माचा अपमान करण्याच्या हेतुने किंवा त्याची माहिती असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा फलक खाली पाडुन त्याला अपवित्र केला व त्याचा अवमान केला, हे अभियोग पक्ष शाबीत करतो काय ? | नाही. |
| ४. | वर नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी बेकायदेशिर जमावाच्या समान उद्येशपुर्ती करीता वर्दिदार व इतर साक्षीदार यानी सार्वजनिक शांतता भंग करावा किंवा इतर गुन्हा करावा याकरीता त्यांना उत्तेजित करण्या करीता त्यांना अश्लील शिवीगाळ करुन हेतुपुरस्सर अपमानित केले, हे अभियोग पक्ष शाबीत करतो काय ? | नाही. |
| ५. | वर नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी बेकायदेशिर जमावाच्या समान उद्येशपुर्ती करीता वर्दिदार व साक्षीदारांना गंभीर इजा करण्याची किंवा ठार मारण्याची धमकी देवुन फौजदारी प्रत धाकदपटशा दाखविला, हे अभियोग पक्ष शाबीत करतो काय ? | नाही. |
| ६. | वर नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी ते अनुसुचित जाती व जमातीच्या प्रवर्गातील नसताना व वर्दिदार व साक्षीदार हे अनुसुचित जात 'महार' या प्रवर्गातील असताना त्यांना सार्वजनिक ठिकाणी जातीवरुन अपमानित | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | करण्याकरीता अश्लील शिवीगाळ केली, त्यांना अपमानित केले, भिती दाखवली व त्यांना पवित्र असलेला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या फलकास खाली पाडुन अपवित्र केले, हे अभियोग पक्ष शाबीत करतो काय ? | |
| ७. | काय आदेश ? | आरोपींना दोषमुक्त करण्यात येते. |

## कारणमीमांसा

०८. या कामी अभियोग पक्षातर्फे एकुण सात साक्षीदार तपासलेले आहेत. अभियोग पक्षाने सा.क्र.१ व्यंकट एकनाथ लांडगे (नि.क्र.६६), सा.क्र.२ तानाजी शंकर वाघमारे (नि.क्र.८७), सा.क्र.३ वैजनाथ शंकर गवळे (नि.क्र. ९९), सा.क्र.४ संतोष शंकर वाघमारे (नि.क्र.१००), सा.क्र.५ जयश्री गौतम सोनकांबळे (नि.क्र.१०१), सा.क्र.६ यमुनाबाई गोविंद वाघमारे (नि.क्र. १०२) व सा.क्र.७ तपासी अधिकारी श्रीधर रघुनाथराव पवार (नि.क्र.१०६) याना तपासले आहे. अभियोग पक्षाने फिर्याद, घटनास्थळ पंचनामा (निशाणी पी–६७/सा.क्र.१), जात प्रमाणपत्राची झेरॉक्स, अटक फॉर्म असा कागदोपत्री पुरावा हजर केला आहे.

**मुद्दा क्र.१ ते ६ करीताः–**

०९. अभियोग पक्ष असे कथन घेवुन आला आहे की, दिनांक ३०.०९.२०१७ रोजी दुपारी १२.०० च्या दरम्याने मरसांगवी ते डोंगरगाव रस्त्यावर मरसांगवी गावात आरोपींनी बेकायदा जमाव केला व वर्दिदार व इतर बौध्द बांधवांनी उभारलेल्या पंचशील ध्वजा जवळच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा फलक खाली टाकुन तो अपवित्र केला, वर्दिदार व साक्षीदारांना अश्लील भाषेत जातीवाचक शिवीगाळ केली व ठार मारण्याची धमकी दिली. त्या अनुषंगाने अभियोग पक्षाने एकंदर सात साक्षीदार तपासले आहेत.

१०. सा.क्र.२ वर्दिदार तानाजी शंकर वाघमारे (निशाणी ८७) याने त्याच्या जबाबात दिनांक ३०.०९.२०१७ रोजी मरसांगवी गावातील पंचशील ध्वज पडल्यामुळे त्याने जळकोट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. आरोपींनी जातीवाचक शिवीगाळ केली, धमकी दिली, ध्वज खाली पडला ही बाब त्याने नाकारली आहे. प्रकरणांमध्ये तडजोड झाल्याची बाब त्याने सरकारी वकिला मार्फत घेतलेल्या उलटतपासात कबुल केली आहे. त्याला लिहीता वाचता येत नाही असे देखील त्याने कबुल केले आहे.

११. सा.क्र.३ वैजनाथ शंकर गवळे (निशाणी ९९) हा देखील बौध्द समाजाचा मरसांगवी गावातील साक्षीदार आहे. त्याने देखील आरोपींनी जातीवाचक शिवीगाळ केली, धमकी दिली व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा फलक पाडला या बाबी नाकारल्या आहेत.

१२. सा.क्र.४ संतोष शंकर वाघमारे (निशाणी १००) हा देखील बौध्द समाजाचा मरसांगवी गावातील साक्षीदार आहे. त्याने देखील आरोपींनी जातीवाचक शिवीगाळ केली, धमकी दिली व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा फलक पाडला या बाबी नाकारल्या आहेत.

१३. सा.क्र.५ जयश्री गौतम सोनकांबळे (निशाणी १०१) ही देखील बौध्द समाजाचा मरसांगवी गावातील साक्षीदार आहे. तिने देखील आरोपींनी जातीवाचक शिवीगाळ केली, धमकी दिली व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा फलक पाडला या बाबी नाकारल्या आहेत.

१४. सा.क्र.६ यमुनाबाई गोविंद वाघमारे (निशाणी १०२) ही देखील बौध्द समाजाचा मरसांगवी गावातील साक्षीदार आहे. तिने देखील आरोपींनी जातीवाचक शिवीगाळ केली, धमकी दिली व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा फलक पाडला या बाबी नाकारल्या आहेत.

१५. उपरोक्त साक्षीदार क्रमांक २ ते ६ यांचे जबाब पाहता त्यांनी अभियोग पक्षास मदत केलेली नाही. ते प्रत्यक्षदर्शी व पिडीत साक्षीदार आहेत.

आरोपींनी बेकायदा जमाव करुन जातीवाचक शिवीगाळ केली, धमकी दिली व फलक पाडला या बाबीं ते नाकारतात.

१६. अशा परिस्थीतीत सा.क्र.१ पंच व्यंकट एकनाथ लांडगे (निशाणी ६६) व सा.क्र.७ तपासी अंमलदार श्रीधर रघुनाथराव पवार (निशाणी १०६) यांचे जबाब शिल्लक राहतात. पंच साक्षीदारानी दिनांक ०२.१०.२०१७ रोजी तो मरसांगवी येथे पोलीसां सोबत गेला होता व त्या ठिकाणी लावलेला फलक खाली पडला होता. पोलीसांनी त्या ठिकाणी पंचनामा करुन तो फलक जप्त केला असे सांगितले आहे. पंचनामा (निशाणी ६७) वर असुन फोटो (आर्टिकल–अ) या ठिकाणी आहेत. तर तपासी अंमलदार यांनी घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदवले असे कबुल केले आहे. त्याने उलटतपासात फिर्यादीचे जात प्रमाणपत्र हे पडताळुन घेतले नाही व आरोपींच्या प्रमाणपत्रावर जात नमुद नाही असे कबुल केले आहे.

१७. प्रत्यक्षदर्शी व पिडीत साक्षीदार हे अभियोग पक्षास मदत करत नसल्याने पंच व तपासी अंमलदार यांचा तांत्रिक पुरावा आरोपींनी केलेला कथित गुन्हा शाबीत करण्यास पुरेसा नाही. आरोपीं विरुध्दचे सर्व आरोप हे सा.क्र.२ ते ६ यांच्या पुराव्यात शाबीत होत नाहीत. किंबहुना त्यानी अभियोग पक्षाची पुर्ण कथने नाकारली आहेत. त्यामुळे आरोपींनी फलक पाडल्याचे व शिवीगाळ तसेच धमकी शाबीत न झाल्याने अनुसुचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियमा खालील गुन्हे शाबीत होत नाहीत. त्यामुळे मुद्दा क्र. १ ते ६ बाबत माझे निष्कर्ष नकारार्थी आहेत.

**मुद्दा क्र. ७ करीताः–**

१८. मुद्दे क्र.१ ते ६ बाबतचे माझे निष्कर्ष पाहता अभियोग पक्षाला आरोपींविरूध्द ठेवण्यात आलेला दोषारोप शाबीत करण्यास अपयश आलेले

आहे. परिणामतः आरोपींना दोषमुक्त करणे योग्य होणार आहे. त्यामुळे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८१ प्रमाणे प्रत्येकी रक्कम रूपये १०,०००/– चा वैयक्तीक जातमुचलका गरज पडल्यास मा.वरिष्ठ अपिल न्यायालयात हजर राहण्याकरीता देण्याचे आरोपींना निर्देश देणे योग्य होणार आहे. जप्त फलक हा लोकभावनेशी निगडीत असल्याने त्याची नियमाप्रमाणे अपील कालावधी नंतर पोलीस ठाणे, जळकोट यानी विल्हेवाट लावण्याचे निर्देश देणे योग्य होणारे आहे. त्यामुळे याकामी मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करतो.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१ तुराब दावल पटेल, क्र.२ नवाज नन्हु शेख, क्र.३ दाउद रशीद बिरादार, क्र. ४. शादुला ऐनोद्दीन गोलंदाज, क्र.५ इस्माईल मौलाखा पठाण, क्र.६ अलहमदु उर्फ हनीफ इस्माईल पठाण, क्र.७. यजाज शादुल गोलंदाज, क्र.८ इमाम खुशाल चंदा, क्र.९.हयुल राशीद बिरादार, क्र.१० जरीनाबी मैनोद्दीन जमादार यांना भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २५८ अन्वये भारतीय दंड संहितेचे कलम १४३, २९४, २९५, ५०४, ५०६ सह १४९ व अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ चे कलम ३(१)(आर)(एस)(टी) अन्वये दंडनिय अपराध केल्याच्या आरोपांतून दोषमुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपींचे वैयक्तिक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहेत. |
| ३. | जप्त मुद्देमाल फलकाची हा नियमाप्रमाणे अपिल कालावधीनंतर योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्यात यावी व तसे निर्देश पोलीस ठाणे, जळकोट याना देण्यात येतात. |
| ४. | आरोपींनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८१ प्रमाणे रक्कम रूपये १०,०००/– चा प्रत्येकी वैयक्तीक जातमुचलका गरज पडल्यास |

| | |
|---|---|
| | मा.वरिष्ठ अपिल न्यायालयात हजर राहण्याकरीता द्यावयाचा आहे व तो सहा महिन्यांसाठी अस्तित्वात राहील. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DIPAK BABALI MHALATKAR
Date: 2026.05.26 17:27:08 +0530

( डि.बी.म्हालटकर )

दिनांक २६.०५.२०२६ विशेष न्यायाधीश तथा अतिरीक्त सत्र न्यायाधीश, उदगीर, जि. लातूर.

**भाग क**

**[परिच्छेद ४४ (III) चे प्रकरण ६ फौजदारी नियमावली]**

**अ. अभियोग पक्ष**

| अ.क्र. | निशाणी | नांव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | ६६ | व्यंकट एकनाथ लांडगे | पंच साक्षीदार |
| सा.क्र.२ | ८७ | तानाजी शंकर वाघमारे | वर्दिदार |
| सा.क्र.३ | ९९ | वैजनाथ शंकर गवळे | साक्षीदार |
| सा.क्र.४ | १०० | संतोष शंकर वाघमारे | साक्षीदार |
| सा.क्र.५ | १०१ | जयश्री गौतम सोनकांबळे | साक्षीदार |
| सा.क्र.६ | १०२ | यमुनाबाई गोविंद वाघमारे | साक्षीदार |
| सा.क्र.७ | १०६ | श्रीधर रघुनाथराव पवार | तपासी अंमलदार |

**ब. बचावाचे साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क. न्यायालयीन साक्षीदार, जर असल्यास**

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/ न्यायालयीन निशाणी क्रमांक.**

**अ. अभियोग पक्ष**

| अ.क्र | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १ | -- | फिर्याद |
| २ | ६७ | घटनास्थळ पंचनामा |
| ३ | -- | जात प्रमाणपत्र |
| ४ | पी-१०७/सा.क्र.७ | पंच मिळण्याकरीता तपासी अंमलदार याने दिलेले पत्र |
| ५ | पी-१०८/सा.क्र.७ ते पी-१११/सा.क्र.७ | साक्षीदारांची तपास टिपणे |
| ६ | पी-११२/सा.क्र.७ ते पी-१२१/सा.क्र.७ | आरोपींचे अटक फॉर्म |

**ब. बचाव पक्ष**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क. न्यायालयीन निशाणी क्रमांक.**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ड. जड वस्तु**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १. | -- | -- |

Digitally signed by DIPAK BABALI MHALATKAR
Date: 2026.05.26 17:27:17 +0530

( डि.बी.म्हालटकर )

दिनांक २६.०५.२०२६ विशेष न्यायाधीश तथा अतिरीक्त सत्र न्यायाधीश, उदगीर, जि. लातूर.

*******